शासकीय कर्मचा-यांनी सचोटी व कर्तव्यपरायणता राखण्याबाबत.......

30 MAR 1994

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्रमांक-सीडीआर-1164/प्रकरण 4/94/अकरा,

मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 18 फेब्रुवारी, 1994.

GR1994021801

**परिपत्रक**

शासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या दैनंदिन कामकाजात सचोटी व कर्तव्यपरायणता राखण्याच्या संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 च्या नियम 3 मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

1) प्रत्येक शासकीय कर्मचा-याने नेहमीच ---

(एक) नितांत सचोटी राखावी,

(दोन) कर्तव्यपरायणता ठेवावी, आणि

(तीन) शासकीय कर्मचा-यांस अशोभनीय ठरेल अशी कोणतीही गोष्ट करता कामा नये.

2. तथापि, काहीवेळा असे आढळून येते की, सर्वच शासकीय अधिकारी/कर्मचारी सचोटीने काम करतातच असे नाही. तसेच पर्यवेक्षीय पदावरील अधिकारी त्यांचे कनिष्ठ अथवा जनतेतील व्यक्ती यांचेसंबंधात वशिलेबाजीने अथवा द्वेषभावनेने काम करतात अशा प्रकारच्या तक्रारीही येतात. अतः शासकीय अधिका-यांनी/कर्मचा-यांनी त्यांच्या कामकाजात निःपक्षपातीपणा राखणे व कोणत्याही व्यक्तीबाबत द्वेषभावना न बाळगणे आवश्यक आहे यावर शासन विशेष भर देत आहे.

3. त्यानुसार सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे लक्ष महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 मधील उपरोक्त तरतुदीकडे वेधण्यात येत आहे व त्यांना वरील तरतुदीचे कटाक्षाने पालन करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. जे अधिकारी व कर्मचारी अयोग्य आणि अवैध वर्तन करुन वरील तरतुदींचा भंग करतील ते उपरोक्त नियमाखाली शिस्तभंग कारवाईस पात्र होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. म. मंडपे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
शासनाचे मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

---

* पत्राने.

शा.म.मु.रोटा/साप्रवि/एच-1198(5000-2-94)

क्र. अरथापना/के. ५ ३२२५/ई५८५

पुणे दिनांक /३/८५

उसं श्रु अ सर्व

-5 APR 1994

४- सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. सी डी आर ११६५/प्रकरण ४/८५/
अकरा दि. १०/५/८५ माहितीस व मार्गदर्शनार्थ ~~सादर अग्रेषित~~

वरमोरे
३११३
क्र. लिपिक

का. अधिक्षक

(सही)
प्र आ पुणे कोष

प्रत - का. क्र. ई ३, ई ४, ई ५ यांचेकडे माहितीसाठी

[redacted]

5 APR 1994

क्र. ९२९५